# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. कैंचाप्पा सिध्दाप्पा हळ्ळे,<br>मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. कैंचाप्पा सि. हळ्ळे / हक्के या अर्जदाराने नवीन शेतीपंपासाठी दि. १३.१.२०१० रोजी जोडणी मिळण्या संदर्भात रु. ५०/– भरुन अर्ज दाखल केलेला आहे. एस.ओ.पी. प्रमाणे मुदतीत कोटेशन न मिळाल्याने ग्राहकाने तक्रार दाखल केली आहे. ग्राहकाच्या अर्जावर अंगठा असून त्यास दस्तूर लावला आहे. अर्जाच्या सुरुवातीपासून हक्के आणि हळ्ळे का हक्के हे स्पष्ट होत नसल्यामुळे रेकॉर्डवर कांही ठिकाणी हक्के व कांही हळ्ळे अशी नोंद झाल्याचे दिसून येत आहे. ग्राहकाने दि. २२.१.२०१० रोजी अंतर्गत कक्षात तक्रार दाखल केली. सदर तक्रारीचा निर्णय दि. २९.१.२०१० रोजी कक्षाने दिला. तथापि सदरचा निर्णय अमान्य असल्याने सी.जी.आर.एफ. कोल्हापूर यांचेकडे दि. १२.३.२०१० रोजी अ प्रपत्रामध्ये तक्रारअर्ज दाखल केला आहे. मंचाने अर्ज दाखल करुन घेवून वि.प.यांचेकडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला.

वि.प.ने सदरचा अहवाल दि. २९.४.२०१० रोजी मंचाकडे पाठविला तो मंचास दि. ३०.४.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. त्यामुळे मंचाने ४.५.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहावे म्हणून उभयतांना नोटीसीने कळविले व त्याप्रमाणे वि.प.चे प्रतिनिधी हे उपस्थित होते. तथापि ग्राहक उपस्थित नव्हते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

प्रस्तुत प्रकरणी १३.१.२०१० रोजी रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरुन ग्राहकाने आपला अर्ज वि.प.कडे दाखल केल्याचे दिसून येते. त्यास वि.प.नेही सहमती दिली आहे. दि. १३.१.२०१० नंतर ग्राहकाने खर्च करावयाचे चलन वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन ३० दिवसांचे आंत म्हणजे दि. १२.२.२०१० पूर्वी देणे आवश्यक होते ते वि.प.ने दि. २९.३.२०१० रोजी दिल्याचे मुद्देनिहाय अभिप्रायात नमूद केले आहे. तसेच तपासणी अहवाल प्राप्त होताच नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल असेही नमूद केले आहे. दरम्यान दि. २९.३.२०१० अशी नोंद असलेला ग्राहकाचा अंगठा व दस्तूर असलेला अर्ज कनिष्ठ अभियंता मैंलापुरे यांनी दि. ४.५.२०१० रोजी मंचासमोर दाखल केला. त्यामध्ये ग्राहकाने स्वखुशीने असे लिहून दिले आहे की, मजला आवश्यक असणारे चलन वि.प.ने म्हणजेच कंपनीने दि. २९.३.२०१० रोजी दिले असल्याने माझी कोणतीही तक्रार नाही व नुकसान भरपाई नको हे मी स्वखुशीने लिहून देत आहे अशा आशयाचे पत्र मंचासमोर सादर केले.

या सर्व बाबीं विचारात घेता १२.२.२०१० ते २९.३.२०१० या कालावधीतील झालेला विलंबाबाबत त्या बद्दलची भरपाई याचा विचार करतां अशी भरपाई देणे योग्य नसल्याचे मंचाचे मत झाले आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) ग्राहकाने दिलेल्या अर्जाचा विचार करुन सदरचा अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :